Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# वसुधैव कुटुंबकम् संकल्पनेअंतर्गत "विकसित भारत 2047 च्या दृष्टीकोनातून उच्च शिक्षणाची भूमिका"

**प्राचार्य डॉ. सुहासकुमार रुपराव पाटील**
मार्गदर्शक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ

**प्रा. भारती बाबाराव ठाकरे**
संशोधिका

## सारांश

"वसुद्यैव कुटुंबकम्" ही भारतीय तत्वज्ञानाची महान संकल्पना असून संपूर्ण जग हे एकच कुटुंब आहे असा तिचा आशय आहे. या संकल्पनेला प्रत्यक्षात व्यवहारात उतरविण्याची सर्वात प्रभावी साधन म्हणजे शिक्षण. विकसित भारत 2047 हा दृष्टीकोन भारताला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, तांत्रिक, नैतिकदृष्ट्या सक्षम राष्ट्र बनविण्याच्या दिर्घकालीन राष्ट्रीय दृष्टीकोन आहे. "वसुद्यैव कुटुंबकम्"या संकल्पनेवर आधारित हा दृष्टीकोन समावेशकता, समता, शाश्वत, विकास व जागतिक सहकार्य यावर भर देते. या दिशेने वाटचाल करतांना शिक्षणातील विषमता कौशल्य व इतर रोजगारातील तफावत, डिजीटल दरी, सामाजिक असमानता, पर्यावरणातील संकट, संशोधनातील मर्यादा व नैतिक मूल्यांचा ऱ्हास अशी विविध आव्हाने समोर येतात ही आव्हाने भारताच्या प्रगतीस अडथळा ठरु शकतात. मात्रा गुणवत्तापूर्ण व मुल्याधिष्ठीत शिक्षण कौशल्याभिमुख प्रशिक्षण, तंत्राज्ञानाचा संतुलित वापर समावेशक विकास धोरणे, नैतिक नागरिकत्वाची जोपासना याव्दारे या अडचणीवर प्रभावी उपाय करता येईल. थोडक्यात असं म्हणता येईल, योग्य नियोजन प्रभावी अंमलबजावणी आणि सामुहिक सहभाग यांच्या माध्यमातून विकसीत भारत 2047 हा दृष्टीकोन साकार होईल. भारत एक सक्षम आत्मनिर्भर शासन व मानव कल्याणकारी जागतिक नेतृत्व करणारे राष्ट्र बनेल.

## प्रस्तावना

भारत स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे वाटचाल करत असतांना विकसीत भारत 2047 हा दृष्टीकोन राष्ट्रीय विकासाचा सर्वांगीण आराखडा म्हणून पुढे आला आहे. हा दृष्टीकोन केवळ आर्थिक प्रगती पुरती मर्यादित नसून सामाजिक समता, शाश्वत विकास, नैतिक मूल्ये आणि जागतिक सहकार्य यांचा समन्वय साधणारा आहे. या व्यापक दृष्टीकोणामागे भारतीय तत्वज्ञातील "वसुद्यैव कुटुंबकम्" म्हणजे संपूर्ण विश्व एक कुटुंब आहे. ही उदात्त भावना केंद्रस्थानी आहे. "वसुद्यैव कुटुंबकम्" ही संकल्पना मानवतेच्या सहअस्तित्वाचा आणि परस्पर कल्याणाचा संदेश देते. या तत्वावर आधारित विकसित भारताची उभारणी करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थाची भूमिक महत्वाची आहे. कारण उच्च शिक्षण केवळ कुशल मनुष्यबळ निर्माण करत नाही, तर मूल्याधिष्ठीत जबाबदार नगारिका घडविण्याचे कार्य करते. ज्ञाननिर्मिती संशोधन नवोन्मेष, कौशल्य विकास, उद्योजकता आणि समाजिक उत्तरदायित्व या माध्यमातून उच्च शिक्षण भारताला ज्ञानाधिष्ठीत राष्ट्र बनू शकते तसेच आंतरराष्ट्रीय सहकार्य सांस्कृतिक संवाद आणि शैक्षणिक देवाण घेवाणीव्दारे भारत ज्ञानगुरु म्हणून जागतिक पातळीवर नेतृत्व करु शकते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या बहुविषयकता लवचिकता भारतीय ज्ञान परंपरा आणि जागतिक दृष्टीकोन यांचा संगम घडवून आणते. जो विकसित

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

भारत 2047 च्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे. यामुळे उच्च शिक्षण हे विकसित भारताच्या संकल्पनेचे बौद्धिक, सामाजिक आणि नैतिक अधिष्ठान ठरते. यासाठी "वसुधैव कुटुंबकम्" या तत्वाच्या प्रकाशात उच्च शिक्षणाची भूमिका समजून घेणे आणि प्रयत्न कृतीत उतरवणे ही काळाची गरज आहे.

## उच्च शिक्षणाचे महत्व

### आर्थिक विकास आणि वाढ

उच्च शिक्षण संस्था अत्यंत कुशल कार्यबल निर्माण करतात जे आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. अभियांत्रिक, वैद्यक व्यवस्थापन माहिती तंत्रज्ञान सारख्या शाखेतील प्रशिक्षित पदविधर औद्योगिक विस्तार सेवा क्षेत्राची वाढ आणि नवोपक्रमांना महत्वपूर्ण योगदान देतात.

### ज्ञाननिर्मिती व संशोधनाला चालना

उच्च शिक्षणामुळे ज्ञान निर्मिती व संशोधनाला चालना मिळते. विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानव्य विद्याा यांच्या माध्यमातून नवीन कल्पना नवोन्मेष आणि जागतिक समस्यांवरील उपाय विकसित होतात यामुळे भारत ज्ञानधिष्ठीत अर्थव्यव्स्थेकडे वाटचाल करतो.

### कुशल व रोजगार क्षम मनुष्य बळ

उच्च शिक्षण कुशल व रोजगारक्षम मनुष्य बळ घडविते. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात आवश्यक असलेली कौशल्ये, उद्योजगता, सर्जनशिलता, आणि व्यावसायिक क्षमता उच्च शिक्षणातून विकसित होतात. त्यामुळे आत्मनिर्भर भारताची संकल्पना साकार होते.

### सामाजिक समता व समावेशक विकासासाठी

उच्च शिक्षण सामाजिक समता व समावेशक विकासाला बळकटी देते. शिक्षणाच्या माध्यमातून वंचित व दुर्बल घटकांना संधी मिळून सामाजिक न्याय प्रस्थापित होते.

### मूल्याधिष्ठीत व जबाबदार नागरिक घडविण्यासाठी

उच्च शिक्षणातून मूल्याधिष्ठीत व जबाबदार नागरिक घडतात. नैतिकता, मानवी मूल्य सहिष्णुता, लोकशाही आणि जागतिक नागरिकत्वाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते जी "वसुधैव कुटुंबकम् या तत्वाची सुसंगत आहे.

### तांत्रिक बदलाशी जुळवून घेण्यासाठी

वेगाने होणाऱ्या तांत्रिक प्रगतीच्या युगात उच्च शिक्षण डिजीटल अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक कौशल्य जसे- कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) डेटा सायन्स आणि सायबर सुरक्षा विद्यार्थ्यांना प्रदान करणे, या शिवाय आजीवन शिक्षणाला प्रोत्साहन देवून व्यक्तींना बदलत्या औद्योगिक, सामाकि गरजांशी सातत्याने जुळवून घेण्यास सक्षम करते.

## भारतीय उच्च शिक्षणातील सध्याचे प्रवाह

भारतीय उच्च शिक्षणात धोरणात्मक सुधारणा तंत्रज्ञानातील प्रगती आणि जागतिक स्पर्धेच्या वाढत्या गरजांमुळे महत्वपूर्ण बदल होत आहेत. काही महत्वाचे प्रवाह या क्षेत्रात घडामोडी घडवून आणतात.

**NEP2020 ची अंमलबजावणी :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 ने बहुविषयक आणि सर्वांगीण शिक्षणावर भर देत उच्च शिक्षणात मोठा बदल घडवून आणला आहे. मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहे.

### बहुविषयक शिक्षण

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

विद्यापिठांना विविध विषयातील अभ्यासक्रम देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते ज्यामुळे विद्यार्थी अनेक विषयामधून निवड करु शकतात आणि बौध्दिक लवचिकता व अनुकूलता विकसित होते. NEP 2020 अभ्यासक्रम रचनेतील लवचिकतेला प्रोत्साहन देते. ज्यामध्ये अनेक प्रवेश व निर्गमन पर्यायाचा समावेश आहे. विद्यार्थी शिक्षणाच्या कालावधीनुसार प्रमाणपत्र डिप्लोमा किंवा पदवी मिळवू शकतात ज्यामुळे वैयक्तिक शिक्षण मार्ग सुलभ होतात. अभ्यासाच्या कालावधीवर आधारीत पदवी देण्याची व्यवस्था करण्यात आली असून व्यक्तीकृत शिक्षण मार्ग सुलभ होतात.

**संशोधनावर भर :** नॅशनल रिसर्च फाऊंडेशन (NFR) ची स्थापना मजबूत संशोधन संस्कृती निर्माण करण्यासाठी संशोधन उत्पादन वाढविण्यासाठी आणि सर्व शाखांमध्ये नवोपक्रमांना पाठबळ देण्यासाठी करण्यात आली आहे.

**डिजीटल आणि ऑनलाईन शिक्षण :** तंत्रज्ञानाच्या एकात्मतेमुळे उच्च शिक्षणातील अध्यापन व अध्ययन प्रक्रियेत मोठा बदल होत आहे.

**एडटेक (Ed Tech) एकत्रिकरण :** शैक्षणिक तंत्रज्ञान मंच, डिजीटल ग्रंथालये आणि आभासी प्रयोगशाळा शिक्षणाची उपलब्धता व परस्पर संवाद वाढत आहे.

**संकरित शिक्षण मॉडेल्स (Hybrid Learning Models)**

ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षणाचा समन्वय असलेले ब्लेंडेड लर्निंग विशेषत: कोविड-19 नंतर वेगाने स्विकारले गेले आहे. यामुळे लवचिक आणि विद्यार्थी केंद्रित अनुभव मिळतो.

**उच्च शिक्षणातील आंतरराष्ट्रीकरण**

भारतीय विद्यापीठे शैक्षणिक व संशोधन मानले. उंचावण्यासाठी जागतिक सहकार्यामध्ये वाढत्या प्रमाणात सहभागी होत आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांशी भागीदारीमुळे प्राध्यापक व विद्यार्थी देवाण-घेवाण, संयुक्त संशोधन प्रकल्प आणि दुहेरी पदवी कार्यक्रम सुलभ होतात. परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करणे. इंग्रजी माध्यमातील उच्च दर्जाचे अभ्यासक्रम व सहाय्यता शैक्षणिक वातावरण निर्माण करुन भारताला आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी पसंतीचे ठिकाण बनविण्याचे प्रयत्न सरु आहेत.

**कौशल्य विकासावर लक्ष :** उद्योगांच्या गरजांशी सुसंगत अभ्यासक्रम राबविणे हे प्राधान्य बनले आहे.

**व्यावसायिक शिक्षण :** उच्च शिक्षणात व्यावसायिक प्रशिक्षणाचा समावेश केलयाने विद्यार्थी कार्यबलासाठी आवश्यक प्रत्यक्ष कौशल्ये मिळतात.

**उद्योग :** संस्थाशी भागदारी : उद्योग भागधारकांशी सहकार्य केल्याने अभ्यासक्रम बाजाराच्या सध्याच्या मागणीनुसार अदयावत होतो. रोजगार क्षमता वाढते आणि उद्योजकतेला चालना मिळते.

**संस्थात्मक स्वायतत व उत्तरदायीत्व वाढवणे :**

**प्रशासन सुधारणा :** उच्च शिक्षणाची कार्यक्षम व गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रशासनिक सुधारणा आवश्यक आहेत.

**स्वायत्त संस्था**

विद्यापीठांना स्वायत्ता दिल्याने नाविण्यपूर्ण अभ्यासक्रम, शैक्षणिक काय्रक्रम आणि मूल्यांकन पध्दती रचना करण्यास अधिक लवचिकता मिळते. मजबुत मान्यता प्रक्रिया व गुणवत्ता हमी मानके अध्यापन, संशोधन आणि संस्थात्मक कामगिरीत उच्च दर्जा राखण्यास मदत करतात. भारतीय उच्च शिक्षणातील चालु सुधारणा व प्रवाह लवचिकता आंतर शाखीयता, संशोधन कौशल्य विकास आणि जगातील सहभाग यावर भर दर्शवितात. NEP 2020 डिजीटल नवोपक्रम आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सशक्त प्रशासनाच्या अंमलबजावणीव्दारे भारत 2047 पर्यंत जागतिक दर्जाच्या उच्च शिक्षण परिसंस्था उभारण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## भारतीय उच्च शिक्षणातील आव्हाने :

### गुणवत्तेतील असमानता

विद्यापीठे व महाविद्यालयामध्ये शिक्षणाची गुणवत्ता एकसमान नाही. अध्यापन, अभ्यासक्रम व मुल्यांकन पध्दतीत फरक आढळतो. अनेक संस्थांमध्ये जुने व उद्योगाचे सध्याच्या गरजांची विसंगत अभ्यासक्रम अजूनही राबविले जातात पात्र व अनुभवी प्राध्यापकांची कमतरता शिक्षण व संशोसनाच्या गुणवत्तेला बाधा आणते.

### उपलब्धता आणि समता

उपलब्धता आणि समता ही भारतीय उच्च शिक्षणातील महत्वाची आवहने आहेत. प्रादेशिक विषमता गुणवत्ता पूर्ण शिक्षणाच्या प्रवेशावर मर्यादा आणते. शहरी भाग व काही राज्यामध्ये संधी अधिक तर ग्रामीण भागात कमी आहेत तसेच आर्थिक अडचणी सामाजिक संकेत आणि अपूरी पायाभूत सुविधा यामुळे उपेक्षित समुदायांचा उच्च शिक्षणातील सहभाग मर्यादत राहतो.

### संशोधन आणि नवोपक्रम

धोरणात्मक भर असूनही जागतिक संशोधन उत्पादनात भारताचे योगदान तुलनेने कमी आहे. अपूरी निधी व्यवस्था, मजबुत संशोधन, संस्कृतीचा अभाव आणि अत्याधुनिक संशोधनासाठी मर्यादित पाठबळ ही प्रमुख आवहने आहेत. उच्च शिक्षणातील नवोपक्रम परिसंस्था अजून विकसीत होत असून संशोधन निष्कर्षाला व्यावसायिकदृष्ट्या उपयुक्त किंवा सामाजिकदृष्ट्या प्रभावी नवकल्पनामध्ये रुपांतर करतांना अडचणी येतात.

### नियमक आव्हाने

भारतीय उच्च शिक्षणाावर नियंत्रण ठेवणारी नियमक व्यवस्था अनेकदा गुंतागुंतीची व तुटक स्वरुपाची असल्याचे मानले जाते. संस्थात्मक स्वायत्तता आणि नियामक देखरेख यामधील नाजूक समतोल राखणे हे कायमस्वरुपी आव्हान राहिले आहे.ज्याचा संस्थात्मक निर्णय प्रक्रिया व नवोपक्रमांवर परिणाम होते.

### रोजगार क्षमता

पदवीधरांची रोजगार क्षमता ही एक महत्वाची चिंता आहे. जी मुख्यत: शैक्षणिक प्रशिक्षण आणि उद्योगाच्या गरजा या मधील कौशल्य विसंगतीमुळे निर्माण होते. शिक्षण संस्था व उद्योग यांच्यातील मर्यादीत सहकार्यामुळे ही दीर अधिक वाढते. ज्यामुळे सध्याच्या कार्यबलाच्या गरजा पूर्ण करु शकणारे रोजगारक्षम पदविधर घडवणे कठीण होते.

भारतीय उच्च शिक्षण प्रणाली सध्या एका निर्णायक टप्प्यावर आहे. या दिर्घकाळापासून अस्तित्वात असलेल्या आव्हानांना समोरे जाण्यासाठी विविध सुधारणा सुर आहेत. या सुधारणांचे यश मुख्यत: त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर संस्थाची अनुकूलता आणि भारतातील विविध लोकसंख्येच्या शैक्षणिक गरजा कितपत पूर्ण केल्या जातात यावर अवलंबून असेल.

### व्हिजन 2047

भारताच्या विकासात्मक उद्दिष्टांमध्ये उच्च शिक्षणची भूमिका व प्रभाव व्हिजन 2047 ही भारत सरकारने मांडलेली एक सर्वसमावेशक व धोरणात्मक चौकट आहे. ज्याचा उद्देश भारताला 2047 पर्यंत स्वातंत्र्याच्या शताब्दीवर्षी विकसित राष्ट्र बनविण्याचा आहे. ही दृष्टी केवळ आर्थिक विकासापूर्ती मर्यादित नसून शिक्षण, आरोग्यसेवा पाायाभूत सुविधा तंत्रज्ञान आणि प्रशासन अशा क्षेत्रामध्ये सर्वांगीण विकासाचा दृष्टीकोन स्विकारते. या व्यापक विकासामध्ये उच्च शिक्षणाला केंद्रस्थानी स्थान आहे. भारताला जागतिक नेतृत्वाकडे नेणारा प्रमुख घटक म्हणून ते कार्य करते.उच्च शिक्षणाच्या संदर्भात व्हिजन 2047 चे महत्व अत्यंत खोलवर आहे. भारताच्या शैक्षणिक व्यवस्थेतील मूलभूत परिवर्तनाची गरज यामध्ये अधोरेखित केली आहे. त्यांच्या मूळ उद्दिष्टांपैकी एक म्हणजे जागतिक स्तरावर स्पर्धातमक अशी शिक्षण प्रणाली उभारणे जी केवळ कुशल व्यावसायिक तयार करणार नाही. तर नाविण्यपूर्ण विचारवंत आणि जबाबदार नागरिक घडवेल ही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शैक्षणिक

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

पायाभूत सुविधा संशोधन आणि विकास प्राध्यापक विकास आणि एकूण शैक्षणिक गुणवत्तेत मोठ्या प्रमाणात गुंतवणुक आवश्यक आहे. व्हिजन 2047 चे मुख्य ध्येय म्हणजे भारतीय विद्यापीठे व संस्थांना आंतरराष्ट्रीय दर्जापर्यंत नेणे. जे जागतिक स्तरावर स्पर्धा करु शकतील ही दृष्टी जागतिक दर्जाच्या संस्था उभारण्याचे समर्थन करते. ज्यामुळै जगभरातून प्रतिभा आकर्षित करता येईल आणि भारताला जागतिक शिक्षण केंद्र बनविता येईल. (Global Hub of Education) समावेशकता (Inclusivity) हा व्हिजन 2047 चा आणखी एक महत्वाचा पैलू आहे. समाजातील सर्व घटकांना विशेषत: उपेक्षित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उच्च शिक्षणामध्ये समान प्रवेश मिळणे. डिजीटल परिवर्तन हे व्हिजन 2047 मधील उच्च शिक्षणाचे एक प्रमुख प्राधान्य बनले आहे. यामध्ये ऑनलाईन शिक्षण मंच आभासी प्रयोगशाळा आणि डिजीटल ग्रंथाचा वापर करुन भौगोलिक मर्यादिपलिकडे गुणवत्ता पूर्ण शिक्षण उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली आहे. तसेच कृत्रिम बुध्दीमत्ता, मशिन लर्निंग बिग डेटा ॲनॅलिटिक्स यासारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश करुन विद्यार्थ्यांना 21 व्या शतकातील रोजगार बाजारासाठी तयार करण्यावर भर दिला आहे. व्हिजन 2047 हे भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेला जागतिक आदर्श प्रणालीत रुपांतरीत करण्यासाठी भविष्योन्मुख चौकट सादर करते. गुणवत्ता समावेशकता नवोन्मेष कौशल्य विकास आणि डिजीटल परिवर्तन यावर लक्ष केंद्रीत करुन हे दृष्टीकोन भारताला 21 व्या शतकातील आणि त्यापुढील आव्हानांना समोर जाण्यास सक्षम करण्याचा प्रयत्न करते. उच्च शिक्षणत व्हिजन 2047 यशस्वीरित्या राबविल्यास भारताचे भविष्य घडवण्यात महत्वाची भूमिका बजावेल आणि भारताला जागतिक स्तरावर ज्ञानसत्ता (Knowledge Super Power) म्हणून स्थान मिळवून देईल.

## उच्च शिक्षणात तंत्रज्ञान समाकलनातील आव्हाने आणि उपाय

उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण अध्यापन, अध्यायन आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी मोठी क्षमता बाळगते, माग त्याची अंमलबजावणी अनेक आव्हानासह येते. प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्याकडून बदलाना होणारा विरोध डिजीटल प्लॅटफॉर्मच्या सुरक्षितता व विश्वासर्हताबाबतच्या चिंता तसेच नवीन तांत्रिक साधने आत्मसात करण्याशी संबंधित अतिरिक्त कामाचा ताण ही संस्थांना भेडसावणारी प्रमुख आव्हाने आहेत. ही आव्हाने दूर करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थानी शिक्षकांसाठी व्यापक प्रशिक्षण व सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाला प्राधान्य द्यावे. कार्यशाळा सेमिनार आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यक्रमांव्दारे प्राध्यापकांना डिजीटल साधने प्रभावीपणे वापरण्यासाठी आवश्यक कौशल्य व आत्मविश्वास मिळू शकतो. विद्यार्थ्यामध्ये डिजीटल साक्षता वाढवणे हे शिक्षणात तंत्रज्ञानाचे फायदे मिळविण्यासाठी अत्यावश्यक आहे. तंत्राज्ञानाचे यशस्वी समाकलन करण्यासाठी प्राध्यापक, प्रशसक आणि विद्यार्थी यांच्यातील सहकार्य आवश्यक आहे. तसेच नवोन्मेष व अनुकूलतेबद्दल सामुहिक बांधिलकी असणे गरजेचे आहे. या आव्हानांना पध्दतशीरपणे हाताळल्यास संस्था डिजीटलदृष्ट्या समृध्द शिक्षण वातावरण निर्माण करु शकताता जे अध्यापनाची परिणामकारकता वाढवते. विद्यार्थी सहभाग सुधारते आणि 21 व्या शतकातील शिक्षणाच्या संदर्भात शेक्षणिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देते.

## निष्कर्ष

भारत स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे 2047 वाटचाल करत असतांना विकसीत भारत ही संकल्पना भारतासमोर आव्हान आणि संधी दोन्ही उभी करते. ज्यामध्ये उच्च शिक्षण राष्ट्रीय विकासाचा प्रमुख चालक म्हणून स्थान मिळवते. विकसीत भारत 2047 च्या संदर्भात उच्च शिक्षण तांत्रिक प्रगती आर्थिक वाढ सामाजिक समता आणि सर्व समावेशक विकासाला योगदान देते. उद्योगांच्या गरजांनुसा कौशल्य विकास आणि वंचित घटकांसाठी प्रवेश योग्यता व समावेशन निश्चित केल्यामुळे रोजगार क्षमता वाढते आणि समाजिक गतीशिलतेला चालना मिळते. या शक्यतानंतरही असमान प्रवेश गुणवत्तेतील दरी आणि तांत्रिक प्रगतीशी जुळवून घेण्यातील अडचणी अशी आव्हाने कायम आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 गुणवत्ता, व्यावसायिक शिक्षण संशोधन आणि बहुविषयक शिक्षणावर भर देते. या समस्यांवर उपाययोजना करण्याचा मार्ग दाखविते. शेवटी उच्च शिक्षण 2047 पर्यंत भारताच्या प्रवासाच्या केंद्रस्थानी आहे. आव्हानांना समोर जात आणि संधीचा प्रभावी वापर करुन भारत

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

कुशल आणि समाधिष्ठीत समाज घडू शकतो. ज्यामुळे शाश्वत विकास साध्य होईल आणि भारत जागतिक ज्ञान नेतृत्व् म्हणून उदयास येईल. थोडक्यात असे म्हणता येईल की, "वसुद्यैव कुटुंबकम्" तत्वाअंतर्गत उद्दिष्टे ही केवळ भारताच्या विकासापूर्ती मर्यादित नसून संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी भारताला मार्गदर्शक राष्ट्र बनविण्याची दृष्टी ठेवतात.

## संदर्भ

भारत सरकार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 शिक्षण मंत्रालय नवी दिल्ली.UGC Higher Education in India Issaes Challenges and Reforms नवी दिल्ली.

निती आयोग विकसीत भारत @2047: दृष्टीकोन दस्ताऐवज भारत सरकार, नवी दिल्ली.

विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) भारतीय उच्च शिक्षण : समस्या व सुधारणा, नवी दिल्ली.

कुलकर्णी एस. आर : उच्च शिक्षणातील समकालीन प्रवाह, मुंबई, हिमालय प्रकाशन.

टिळक जे. बी. जी. भारतामधील शिक्षण व विकास. ज्ञान पब्लिशिंग हाऊस.